वि.क्र.६.१ ।। श्री ।। बा. भा. रु. ५६०/-

# विक्रीखत

**मौजे खडकी बु।।** येथील ग्रामपंचायत हद्दीतील बिनशेती बखळ प्लॉट जागेचे आजच्या बाजार भावाप्रमाणे किंमत रुपये /- अक्षरी रुपये मात्र आज दिनांक -

**लिहून घेणार :-**

वय - वर्ष, धंदा -

राहणार -

**लिहून देणार :-**

सौ. संगिता प्रशांत देशमुख वय - ४५ वर्षे, धंदा - घरकाम

राहणार - हिरापूर रोड, चाळीसगांव जि.जळगांव

कारणे खरेदीखत लिहून देते की,

तुकडी जिल्हा व जि. प. जळगांव पोट तुकडी तालुका पं. स. चाळीसगांव पैकी **मौजे खडकी बु।।** येथील ग्रामपंचायत हद्दीमधील बखळ जागा यास -

**शेत गट नं. १०/२, यातील प्लॉट नं. ,क्षेत्रफळ चौ. मी. म्हणजेच चौ.फुट.**

**यासी चतुःसिमा :-**

**पुर्वेस** -

**पश्चिमेस** -

**दक्षिणेस** -

**उत्तरेस** -

येणे प्रमाणे चतुःसिमेतील **प्लॉट नं. , क्षेत्र चौ. मी.** आतील तदंगभुत वस्तुंसह तळजमिनसह, दगडमाती सहित, पुर्ण मालकी हक्काने आज रोजी लिहून घेणार यांच्या निर्वेध, बिनबोजा, कबजात दिला आहे. कबजाबद्दल तक्रार , हरकत नाही.

सदर गट नं. १०/२ ही जमिन माझे मालकी हक्काची असून सदर जमिनीत मी २०१२ साली निवासी प्रयोजनार्थ प्लॉटस पाडलेत सदरचे प्लॉटसचा लेआऊट नकाशा सहा. संचालक नगररचनाकार जळगांव यांनी मंजुर करुन पत्र नं. ३२३९ दिनांक - ६/१०/२०१२ ने बिनशेती शिफारस केली आहे.

मंजुर नकाशातील सर्व प्लॉटस हे म. जिल्हाधिकारी सो. जळगांव यांचे आदेश क्रमांक - जमिन /२/बि. शे./एस. आर. /९१/२०१२ दिनांक - ६/४/२०१३ ने रहिवासी प्रयोजनार्थ बिनशेती वापराकडे वर्ग केले आहेत. त्याची नोंद ७/१२ ला क्रमांक - ४७९४ ने दाखल झाली आहे.

मंजुर नकाशातील **प्लॉट नं. क्षेत्र चौ. मी.** माझे स्वंसपादीत मालकी हक्काचा व माझे प्रत्यक्ष कब्जा उपभोगातील प्लॉट असून प्लॉट माझे कब्जात आहे. माझा मालकी हक्क प्रस्थापीत केला आहे. सबब **चौ. मी.** जागा आजमितीस निर्वीवाद पणे माझे प्रत्यक्ष कब्जा उपभोगात वहिवाटीत असून माझा मालकी हक्क निर्वेध व निर्वीवाद असा असून हस्तांतरणीय आहे. त्याबाबत सरकार दरबारी कोर्टदरबारी, कोणतीही बाब न्यायप्रविष्ठ नाही.

आशा प्रकारे माझे मालकी हक्काचा **प्लॉट नं. क्षेत्र चौ. मी.**प्लॉट जागा मी तुम्हांस रक्कम रुपये /- अक्षरी रुपये मात्र ला कायम फरोक्त खरेदी दिला आहे. व प्लॉट जागा मालकी हक्काने तुमचे प्रत्यक्ष कब्जात दिली आहे. तुमचा मालकी हक्क प्रस्थापीत केला आहे. कब्जा बद्दल तक्रार हरकत नाही.

रुपये /- अक्षरी रुपये मात्र चा भरणा मला तुमचेकडून आजरोजी घरी रोख मिळाला तो कबुल सबब भरणा रोख स्वरुपात मिळाला तो पोहचला तक्रार नाही.

तुम्हास खरेदी दिलेल्या **प्लॉट नं. क्षेत्र चौ. मी.** बखळ प्लॉट जागेवर माझा अथवा माझे इस्टेटवाली वारसांचा कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध राहिला नाही. खरेदी दिलेली जागा पर्णपणे बखळ, असून त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम नाही. कोणाचा अनाधिकृत कब्जा वहिवाट नाही. बीन बोजाची निर्वेध जागा तुम्हास खरेदी दिली आहे. त्यावर कुणाचे हक्क हितसंबंध नाहीत. कोणास यापुर्वी लेखी, तोंडी, सौदा, खरेदी, बक्षीस, गहाण,

तारण, दान, भाडेपट्टा आदि मार्गाने तबदिल वा हस्तांतरीत केलेली नाही. इतःपर कोणी तुमचे कबजास मालकी हक्कास बाधा आणल्यास, हरकत अडथळा केल्यास त्याचे निवारण मी माझे खर्चाने करुन देईन. तुम्हास झळ तोशीस लागु देणार नाही. सदर जागेचा तुम्ही मालकी हक्काने वंशपरंपरा निरंतर उपभोग घ्यावा अथवा तुमचे इच्छेनुसार व्यवस्था करावी त्यास माझी हरकत नाही.

सदर जागेचा बिनशेती कर आम्ही आजपर्यंत भरलेला असुन यापुढील कर तुम्ही नियमित भरावा व जागेला हक्क पत्रकी तुमचे नांव लावुन घ्यावे त्यास आमची हरकत नाही.

ह्या खरेदीखताने तुम्ही **प्लॉट नं. , क्षेत्र चौ. मी. या** प्लॉट जागेचे खरेदीदार मालक झाला आहात सबब जागेचा मालकी हक्काने वंशपरंपरा, निरंतर उपभोग घ्यावा अथवा तुमचे इच्छेनुसार व्यवस्था करावी. त्यास माझी हरकत नाही.

हे खरेदीखत मी समक्ष हजर राहून समजून, उमजून व राजीखुशीने लिहून दिले.

**लिहून घेणार :-**

------------------------------------------

**लिहून देणार :-**

सौ. संगिता प्रशांत देशमुख ------------------------------------------ Sp Deshh.

**साक्षीदार :** १) ------------------------------------------

२) ------------------------------------------